## सेटलमेंट

*('अंतःस्थ'*
*(प. आ. १९९३) मधून साभार)*

सेटलमेंट, केवळ शारीरिक दुःखानी होरपळला नाही
तुझ्या मुलखातला जायबंदी इतिहास.

किती सहज बदलल्या त्यांनी
माणसांच्याच व्याख्या
गर्भातल्या हुंकारातच अडकवल्या
जन्मजात गुन्हेगारीच्या बेड्या.

भटकंतीत मावळलेल्या आयुष्यांनी कमावली
चाबूक सहन करणारी उत्तम कातडी
जगण्याच्या जीवघेण्या संकल्पांनी
दिली स्वप्नांनाच मूठमाती.

सार्वभौम पहाऱ्यातल्या काटेरी भिंतीआड
क्रूर विटंबनेचा पाऊस कोसळला
आईच्या पदरातल्या असहाय ठिगळांवर
भाकरीच्या झुंजीचा अर्थ उमटला...

सेटलमेंट, कुठे हरवली
अजूनही उमगत नसलेली
स्वातंत्र्याची लिपी
कुठे हरवला
नेहरूंच्या डोळ्यांतील अथांग गहिवर...

सेटलमेंट, कबूल आहे
तुझ्या मुलखातले ऋतू बदलताहेत
बदलतेय तुझ्या वर्तमानाची दिशा,
पण बदलाची ही भाषा
तू नीट शिकून घ्यावीस हेच बरं.
तुझ्या पहाडी नायकांना
आता ते राजरोस खरीदतील,
सगळे हुकमाचे पत्ते स्वतःच्या राहुट्यांना डकवून
पद्धतशीर सृजनाचे हात छाटतील.

सेटलमेंट, तुझ्या कुंपणाएवढ्या आभाळापलीकडे
आता तू बघायला शीक
एकदा तरी डोळे भिडवून बघ,
त्यांनी पेरलेल्या सुरुंगाशी
वादळाच्या संभाव्य धोक्याचे इशारे
तू ओळखून घे
तुझ्या ओसाड छावण्यांना
आता तरी स्वतःचा प्रकाश दे.

**प्रज्ञा दया पवार**
ठाणे
ईमेल pradnyadpawar@gmail.com